अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 11 जून 2026 | वर्ष 11 वे | अंक 44 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# गोसीखुर्द सिंचन घोटाळयाने परिसरात खळबळ

## जलसंपदाच्या माजी मुख्य अभियंत्यासह ४ अधिकारी व कंत्राटदारांवर एसीबीकडून गुन्हा दाखल!

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसीखुर्द सिंचन प्रकल्पांतर्गत ब्रम्हपुरी येथील उजव्या मुख्य कालव्यावरील कामात कोट्यवधी रुपयांचा अपहार आणि निविदा प्रक्रियेत गंभीर अनियमितता केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ँ) मोठी कारवाई केली आहे. बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल आणि पदाचा गैरवापर करून कंत्राटदाराला कोट्यवधींचा गैरलाभा मिळवून दिल्याबद्दल तत्कालीन मुख्य अभियंता, कार्यकारी संचालक, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि कंत्राटदार फर्मच्या भागीदाराविरुद्ध ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूरचे पोलीस उपअधीक्षक अनिल मोहनरेड्डी जिट्टावार यांनी सरकारतर्फे ही अधिकृत फिर्याद दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल जनहित याचिका (क्र. ९२/२०१२ आणि ८३/२०१२) च्या आदेशान्वये गृह विभाग आणि अँटी करप्शन ब्युरो मुख्यालयाच्या निर्देशानुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या (VIDC) प्रकल्पांमधील अनियमिततेची उघड चौकशी आदेशित करण्यात आली होती. तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी व पोलीस उपअधीक्षक अनामिका मिर्झापुरे यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हा गुन्हा नोंदवण्यात आला. गोसीखुर्द उजवा मुख्य कालवा विभाग ब्रम्हपुरी अंतर्गत सा.क्र. ६३९५० मी. वरील डी-७ वितरीकेमधील मातीकाम व बांधकामाची रु. १२,६३,५०,१४४/- (१२.६३ कोटी) मूल्याची निविदा जून २००९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. या निविदेसाठी ५ कंत्राटदारांनी अर्ज केले होते. त्यापैकी मे. सुमेधा अर्थमुव्हर्स कं. अँड सुवर्णा इंटरप्रायजेस, पुणे (जे.व्ही.) या फर्मला पात्र ठरवून काम देण्यात आले. मात्र, चौकशीदरम्यान या फर्मने सादर केलेली सर्वच्या सर्व ४ पुर्वानुभव प्रमाणपत्रे पूर्णतः बनावट आणि बोगस असल्याचे निष्पन्न झाले. धोम बलकवाडी प्रोजेक्ट, वाई (सातारा) या कार्यालयाने असे कोणतेही प्रमाणपत्र दिले नसल्याचे आणि काम दिले

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# निवडणूक बिनविरोध, पण नगरसेवकांचा 'गेम' विस्कटला!

## सहली, मेजवान्या आणि धनलाभाच्या अपेक्षेवर पाणी, मतदानाचा हक्क हुकल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींमध्ये प्रचंड नाराजी

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत अखेरच्या क्षणी नाट्यमय घडामोडी घडल्या. महाविकास आघाडीच्या दोन्ही प्रमुख उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे भाजपचे उमेदवार अरुण लखानी यांची विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाली आहे. या बिनविरोध निवडीमुळे भाजपच्या गोटात प्रचंड उत्साहाचे वातावरण असले, तरी तिन्ही जिल्ह्यातील नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या नगरसेवकांमध्ये मात्र कमालीची शांतता आणि प्रचंड नाराजी पसरली आहे. निवडणूक बिनविरोध झाल्याने या लोकप्रतिनिधींचा मतदानाचा हक्क तर हिरावला गेलाच, पण त्यासोबतच निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या 'लक्ष्मीदर्शना'वर आणि शाही मेजवान्यांवर पाणी फेरले गेल्याने नगरसेवकांच्या दुःखाला पारावार उरलेला नाही.




१८ जून २०२६ रोजी होणाऱ्या या निवडणुकीसाठी राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. या निवडणुकीसाठी चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ९७७ कार्यरत सदस्य मतदानाचा हक्क बजावणार होते. यामध्ये सर्वाधिक मतदार चंद्रपूर जिल्ह्यातील (४६९) होते, ज्यात चंद्रपूर मनपाचे ६६ सदस्य, १० नगर परिषदा आणि ७ नगर पंचायतींच्या ४०३ सदस्यांचा समावेश होता. याशिवाय वर्धा जिल्ह्यातील २६४ आणि गडचिरोली जिल्ह्यातील २४४ मतदार या निवडणुकीत किंगमेकर ठरणार होते. विशेष म्हणजे तिन्ही जिल्ह्यांत जिल्हा परिषदांच्या सदस्यांची संख्या शून्य असल्याने संपूर्ण मदार नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या नगरसेवकांवर होती. भाजपचे अरुण लाखानी यांच्याविरोधात महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे अधिकृत उमेदवार शैलेश अग्रवाल आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधीर कोठारी यांनी शड्डू ठोकला होता. त्रिकोणी लढत होणार हे स्पष्ट असल्याने घोडेबाजार तेजीत येण्याची पूर्ण शक्यता होती. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी अचानक आपली उमेदवारी मागे घेतली आणि लाखानी यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला.

विधान परिषद निवडणूक जाहीर झाली की स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांचे 'अच्छे दिन' येतात, हा आजवरचा इतिहास आहे. याही वेळी तिन्ही जिल्ह्यांतील नगरसेवकांनी मोठी गणिते मांडली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदान करणाऱ्या सदस्यांना (नगरसेवकांना) नेहमीच 'विशेष' महत्त्व असते. यंदा जिल्हा परिषदांच्या सदस्यांची संख्या 'शून्य' असल्याने पूर्ण मदार नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या ९७७ सदस्यांवर होती. त्यामुळे या मतदारांचे भाव गगनाला भिडले होते. नगरसेवकांनी या निवडणुकीच्या निमित्ताने अनेक 'गुलाबी' स्वप्ने रंगवली होती. त्यात प्रामुख्याने मत पदरात पाडून घेण्यासाठी उमेदवारांकडून मिळणाऱ्या 'तगड्या पाकिटांची' नगरसेवकांना मोठी आशा होती. मत फुटू नये

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकिय...

# सोशल मिडीयातून रस्त्यावर!

भारतीय राजकारणात नव्या पक्षांचा उदय ही काही नवीन घटना नाही. मात्र प्रत्येक नव्या राजकीय प्रयोगामागे असणारी सामाजिक पार्श्वभूमी, त्याची मांडणी आणि जनमानसात निर्माण होणारी उत्सुकता यामुळे काही प्रयोग विशेष ठरतात. अमेरिकास्थित भारतीय तरुण अभिजीत दिपके यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'ने राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे केलेले पहिले आंदोलन हे अशाच प्रकारचे लक्षवेधी प्रकरण ठरले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या या चळवळीने प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून आपले अस्तित्व दाखवून दिले आहे.

गेल्या दशकात सोशल मीडिया हे केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही. विचारप्रसार, जनमतनिर्मिती आणि संघटन उभारणीचे ते प्रभावी माध्यम बनले आहे. जगातील अनेक सामाजिक व राजकीय चळवळींच्या यशामागे या माध्यमाची मोठी भूमिका राहिली आहे. भारतातही विविध प्रश्नांवर सोशल मीडियाच्या माध्यमातून मोहिमा उभ्या राहिल्या; परंतु त्या प्रत्यक्ष आंदोलनात कितपत रूपांतरित होतात, हा प्रश्न कायम राहिला. कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाने या प्रश्नाला नव्या संदर्भात पुढे आणले आहे. जंतरमंतरवरील आंदोलनाला तरुणांचा मिळालेला प्रतिसाद हा या प्रयोगाचा महत्त्वाचा पैलू मानावा लागेल. बेरोजगारी, शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, स्पर्धा परीक्षांतील गैरव्यवहार आणि शासनाविषयी वाढत चाललेला अविश्वास या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये असंतोष आहे. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीचा मुद्दा पुढे करून या पक्षाने युवकांच्या भावनांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आंदोलनाला केवळ कुतूहल म्हणून पाहता येणार नाही.

या आंदोलनाबाबत विविध राजकीय पक्षांच्या प्रतिक्रिया देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आंदोलनाला परवानगी देत दडपशाहीचा मार्ग स्वीकारला नाही. लोकशाही व्यवस्थेत हे स्वागतार्ह आहे. दुसरीकडे प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने या आंदोलनापासून अंतर राखण्याचा निर्णय घेतला. तर तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष, डावे पक्ष आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांनी पाठिंबा दर्शविला. या भूमिका केवळ तात्कालिक राजकीय गणितांमधून समजून घ्याव्या लागतील. नव्या पक्षाला मिळणारी राजकीय जागा ही कोणाच्या वाट्याची जाऊ शकते, याचे भान प्रत्येक पक्षाला असते. मात्र या संपूर्ण घडामोडीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कॉकरोच जनता पार्टीची वैचारिक आणि संघटनात्मक गंभीरता. सध्या तरी हा पक्ष निवडणूक राजकारणात उतरणार नसल्याचे सांगत आहे. त्याची निवडणूक आयोगाकडे नोंदणीही झालेली नाही. त्यामुळे हा पक्ष आंदोलनवादी दबावगट राहणार की भविष्यात राजकीय पक्ष म्हणून उभा राहणार, हे स्पष्ट झालेले नाही. कोणतीही चळवळ केवळ सोशल मिडियावरील लोकप्रियतेच्या जोरावर दीर्घकाळ टिकत नाही.

जगातील अनेक देशांमध्ये युवकांच्या असंतोषाने राजकीय उलथापालथ घडवून आणली आहे. नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंका यांची उदाहरणे ताजी आहेत. तथापि भारताची परिस्थिती वेगळी आहे. येथे लोकशाही संस्था तुलनेने अधिक मजबूत आहेत आणि सत्ताबदलाचा घटनात्मक मार्ग निवडणुकांमधूनच जातो. नावीन्य, वेगळेपणा आणि प्रस्थापित व्यवस्थेविरोधातील भावना यामुळे नव्या उपक्रमांना प्रारंभी मोठा प्रतिसाद मिळतो. परंतु त्याच वेगाने लोकांचे लक्ष दुसरीकडेही वळते. सोशल मीडियावरील लाखो फॉलोअर्स, सदस्यत्व किंवा व्हायरल मोहिमा यांचे प्रत्यक्ष राजकीय पाठिंब्यात रूपांतर होईलच असे नाही. डिजिटल लोकप्रियता आणि संघटित जनाधार यांतील फरक अनेक चळवळींना अनुभवावा लागला आहे. म्हणूनच कॉकरोच जनता पार्टीसमोरील सर्वात मोठे आव्हान हे प्रसिद्धी मिळविण्याचे नसून ती टिकवून ठेवण्याचे आहे. युवकांचे प्रश्न मांडणे, शासनाला उत्तरदायी धरणे आणि लोकशाही पद्धतीने दबाव निर्माण करणे हे कोणत्याही समाजासाठी उपयुक्त असते. परंतु त्यासाठी आंदोलनांइतकीच महत्त्वाची बाब म्हणजे पर्यायी धोरणांची मांडणी, केवळ असंतोष व्यक्त करून दीर्घकालीन राजकीय विश्वास संपादन करता येत नाही.

# ओबीसींचे राजपत्र निघाल्याशिवाय माघार नाही

## - सचिन राजुरकर

ब्रह्मपुरी/का.प्र.

सध्या देशात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत इतर मागास वर्ग (OBC) यांचा स्वतंत्र स्तंभ नसल्यामुळे ओबीसी समाजावर अन्याय होत आहे. शासनाने यापूर्वी ओबीसींची जातनिहाय जनगणना करू, असे आश्वासन दिले होते; मात्र प्रत्यक्ष जनगणनेत ते अमलात आलेले नाही. त्यामुळे जोपर्यंत ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेसाठी शासनाकडून स्पष्ट राजपत्र (Gazette) काढले जात नाही, तोपर्यंत माघार नाही, अशी ठाम भूमिका सचिन राजुरकर, महासचिव, राष्ट्रीय ओबीसी महासंघ यांनी मांडली.



ते ब्रह्मपुरी येथे आयोजित सहविचार सभेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ओबीसींची जातनिहाय जनगणना तातडीने घेण्यात यावी, तसेच 'राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती राखीव प्रवर्गातच होणार' या दिनांक १४ मे २०२६ च्या शासन निर्णयाचा रद्दबातल आदेश काढण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी दिनांक २८ जून २०२६ रोजी चंद्रपूर येथे भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चाच्या नियोजनासाठी ब्रह्मपुरी येथे सदर सहविचार सभा पार पडली. या सभेला प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद चिमूरकर (माजी जिल्हा परिषद सदस्य, चंद्रपूर), विनोद झोडगे (सामाजिक कार्यकर्ते, ब्रह्मपुरी), कृष्णा मसराम (जिल्हाध्यक्ष, आदिवासी विकास परिषद, चंद्रपूर), जयदीपजी रोडे (सामाजिक कार्यकर्ते, चंद्रपूर), रवींद्र पिलारे सर (अध्यक्ष, ओबीसी कर्मचारी महासंघ, ब्रह्मपुरी) तसेच खोकले मॅडम (महिला अध्यक्ष, ओबीसी महासंघ, ब्रह्मपुरी) यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमोद चिमूरकर यांनी सर्व ओबीसी बांधवांनी संघटित होऊन, विशेषतः युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन हा महामोर्चा यशस्वी करावा व ओबीसींचा आवाज बुलंद करावा, असे आवाहन केले. यावेळी विनोद झोडगे यांनीही 'जोपर्यंत जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र स्तंभ येत नाही, तोपर्यंत माघार नाही; गरज पडल्यास प्राणत्यागही स्वीकारू, पण अन्याय मान्य करणार नाही,' अशी ठाम भूमिका मांडली.

अध्यक्षीय भाषणात सचिन राजूरकर यांनी सांगितले की, राष्ट्रीय ओबीसी महासंघाने ओबीसी समाजासाठी सातत्याने काम केले आहे. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे, 'महा-ज्योती' संस्थेची स्थापना, शिष्यवृत्ती योजना यांसारख्या अनेक उपक्रमांतून महासंघाने पुढाकार घेतला आहे. मात्र आता जातनिहाय जनगणना हा ओबीसी समाजाच्या हक्कांचा मूलभूत प्रश्न आहे. एससी व एसटी समाजाची जातनिहाय जनगणना होत असताना ओबीसींना वगळणे हा मोठा अन्याय असून, ओबीसींची खरी संख्या समोर आल्याशिवाय राजकारण, शिक्षण व विविध शासकीय योजनांतील हक्क मिळणार नाहीत. त्यामुळे शासनाने तातडीने राजपत्र काढावे, अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या सभेला सुरेश बुराडे, केवळराम मैद, टिकेश शिवणकर, राहुल भोयर, भाऊराव राऊत, महेंद्र मातेरे, अरविंद राऊत, विजय बगमारे, दिलीप बावनकर, नंदू मस्के, पिंकी राऊत, रीना ठाकरे, पूनम ठेंगरे, योगेश ढोंगे, भास्कर सोंदरकर, विलास मैद, रवींद्र पवार, राजू कुथे, रामभाऊ नरड, नयना आजबले, प्रतिभा भोयर, यशवंत तलमले, गजानन रणदिवे, व्ही. जी. रणदिवे यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र पिल्लारे सर यांनी केले, सूत्रसंचालन लक्ष्मण मेश्राम सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश बुराडे सर यांनी मानले.

# पर्यावरण दिनानिमित्य वृक्षारोपण संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सहिष्णु फाउंडेशनच्या वतीने पॉलिटेक्निक कॉलेजच्या मैदान परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमात फाउंडेशनचे पदाधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारीही सर्वांनी स्वीकारली. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यशस्वी आयोजनासाठी सहभागी सर्वांचे आभार मानण्यात आले.

## विनोदिनी

गणितात "ढ" असणाऱ्या बंड्याला १०० पैकी ९० गुण मिळाले...

मॅडम : बंड्या... तुला ९० गुण देतांना मला खुप आनंद होत आहे...

बंड्या : मॅडम... तुम्ही तुमचा आनंद द्विगुणित करू शकता...

मॅडम : ते कसं काय...

बंड्या : मॅडम मला पूर्ण १०० गुण देऊन टाका... म्हणजे तुमचा आनंद दुप्पट होईल...

# नागरी समस्यांवर योग्य कार्यवाही करून तात्काळ उपाययोजना करा

## भारतीय जनता पार्टी शहरच्या वतीने जनआंदोलनाचा इशारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांबाबत भारतीय जनता पार्टी, ब्रम्हपुरी शहरच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले.भाजप चे नगरसेवक मनोज भूपाल यांच्या सहकार्याने शहरातील समस्यांबाबत आढाव बैठकीतून नगरपरिषद येथे शहरातील पाणीटंचाई, नाल्यांची अपूर्ण सफाई, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, स्मशानभूमीतील अपुऱ्या सुविधा, बंद पडलेले ट्रॅफिक सिग्नल व सीसीटीव्ही कॅमेरे, अतिक्रमणाचा प्रश्न आदी गंभीर विषय या निवेदनाद्वारे मांडण्यात आले.



निवेदन स्वीकारल्यानंतर ब्रम्हपुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी भाजप पदाधिकाऱ्यांसोबत सुमारे दोन तास सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील विविध प्रभागांतील समस्या आणि नागरिकांच्या अडचणींबाबत सखोल चर्चा करण्यात आली. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या प्रभागातील स्थानिक प्रश्न मुख्याधिकाऱ्यांसमोर मांडले तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत असलेल्या परिणामांची माहिती दिली. बैठकीत विशेषतः शहरातील तीव्र पाणीटंचाई, रेल्वे फाटकाच्या पलीकडील भागात तातडीने नवीन नळ कनेक्शन उपलब्ध करून देणे, पाण्याची कमतरता असलेल्या भागांमध्ये शासकीय निधीतून अतिरिक्त बोअरवेल उभारणे, भूमिगत गटार योजनेमुळे खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, नाल्यांच्या सफाईनंतर रस्त्यांवर पडून असलेला मलबा हटविणे, नियमित कचरा उचल व्यवस्था सुरू करणे तसेच शहरातील वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत करण्यासाठी ट्रॅफिक सिग्नल व सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली. मुख्याधिकाऱ्यांनी सर्व समस्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन दिले. तसेच विविध प्रश्नांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष डॉ. सुयोगकुमार वा. बाळबुध्दे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे शहर महामंत्री तथा नगरसेवक मनोज भूपाल, पवन जयस्वाल, ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा.प्रकाशजी बागमारे, माजी अध्यक्ष अरविंद नंदुरकर, माजी नगरसेवक मनोज वठे, स्वप्नील अलगदेवे,म हिला अध्यक्ष वर्षा चौधरी, युवा मोर्चा अध्यक्ष अमित रोकडे, ओबीसी सेल चे अध्यक्ष दिलीप जुंबळे, भाजप जिल्हा सचिव साकेत भानारकर, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री तनय देशकर, अनुसूजीत जातीचे अध्यक्ष प्रकाश लोखंडे, राजू भागवत, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रश्मीताई पेशने, मंजिरीताई राजनकर, रत्ना दंडवते, चेतना येवले, दत्ता येरावार, अंकज कानझोडे, बंटी येरावर, डॉ.अशोक सालोटकर, केतन पेशन, वर्षा जोशी, घनश्याम सूर्यवंशी अनेक पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत भाजप सातत्याने पाठपुरावा करणार असून प्रशासनाने तात्काळ कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# रणमोचन येथे मृदा व जलसंधारणाचा संकल्प

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत विविध योजनांचे मार्गदर्शन

ब्रह्मपुरी/का.प्र.

मृदा व जलसंधारण कामे लोकसहभागातून अधिक प्रभावीपणे राबवण्याच्या उदात्त उद्देशाने, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० (पोखरा) अंतर्गत उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय नागभीड यांच्या वतीने चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यात येणाऱ्या रणमोचन या गावी भव्य 'जलदिंडी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ४ जून २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी आणि महिला बचत गटांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमादरम्यान कृषी विभागातील विविध अधिकारी आणि तज्ज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेतीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले उप कृषी अधिकारी (गांगलवाडी) कु. एस. जी. दरेकर यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी कोणत्या विविध बाबींचा लाभ घ्यावा, याविषयी सविस्तर आराखडा मांडला. तसेच चेतक खोब्रागडे यांनी पोखरा योजनेअंतर्गत शेततळे, फळबाग लागवड यासाठी लागणारे आवश्यक फॉर्म्स आणि कागदपत्रे याविषयी महत्त्वाची माहिती दिली. आर. आर. थूल (सहाय्यक कृषी अधिकारी) यांनी कृषी विभागाच्या इतरही विविध कल्याणकारी योजनांवर प्रकाश टाकला.

NRM समन्वयक कुणाल कुंभरे यांनी जलसंधारणाची कामे आणि लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. तर कु. के. व्ही. तेलंग (सहाय्यक कृषी अधिकारी, रणमोचन) यांनी मातीचा नमुना घेण्याची अचूक पद्धत आणि मृदा परीक्षणाचे शेतकऱ्यांना होणारे फायदे प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले. 'आत्मा' ब्रह्मपुरीचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक ए. पी. हातझाडे यांनी 'नैसर्गिक शेती ही काळाची गरज' असल्याचे सांगत बिजामृत आणि घन जीवामृत तयार करण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. पी. एस. आस्कर (सहाय्यक कृषी अधिकारी) यांनी ३ टक्के मिठाच्या द्रावणातील धान बीजप्रक्रिया आणि त्याचे फायदे याबद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. तसेच 'उमेद'चे छत्रपती बगमारे यांनी दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत व त्याचे शेतीमधील महत्त्व पटवून दिले. 'शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली शेती समृद्ध करावी. असे मत नीलिमा राऊत, सरपंच, रणमोचन यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कृषी ताई द्वारका पिलारे यांनी केले. कार्यक्रमाला रणमोचन गावच्या सरपंच नीलिमा राऊत, पोलीस पाटील अस्मिता पिलारे यांच्यासह स्थानिक महिला बचत गटातील महिला, प्रगतीशील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलदिंडीच्या माध्यमातून गावात जल साक्षरतेचा संदेश देण्यात आला.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# निशिकांत बुल्ले यांना आचार्य पदवी बहाल

## गडचिरोली जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक या विषयावर शोधप्रबंध

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील अर्थशास्त्र विभागाचे संशोधक विद्यार्थी निशिकांत बुल्ले यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली तर्फे नुकतीच अर्थशास्त्र विषयातील सर्वोच्च 'आचार्य' (पीएच. डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या घवघवीत यशामुळे महाविद्यालयीन स्तरावर आणि शैक्षणिक वर्तुळात त्यांचे भरभरून कौतुक होत आहे.

निशिकांत बुल्ले यांनी आपला हा महत्त्वपूर्ण शोधप्रबंध 'गडचिरोली जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक : एक अभ्यास' या अत्यंत संवेदनशील आणि अभ्यासपूर्ण विषयावर सादर केला. त्यांनी हे संशोधन कार्य नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या अधिकृत संशोधन केंद्रांतर्गत, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजू आदे यांच्या कुशल आणि अत्यंत मोलाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केले. गडचिरोली सारख्या आदिवासी आणि दुर्गम जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक



विकासाच्या दृष्टीने हा संशोधन प्रबंध अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

निशिकांत यांनी कठीण परिश्रम घेऊन ही आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

आपल्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना निशिकांत बुल्ले यांनी भावूक होत आपल्या यशाचे श्रेय सर्वप्रथम आपल्या आई-वडिलांना आणि मार्गदर्शक डॉ. राजू आदे यांना दिले. यासोबतच महाविद्यालयाचे कार्यवाहक प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, माजी प्राचार्य डॉ. एन. एस. कोकोडे, माजी प्राचार्य डॉ. धनंजय गहाणे, प्रा. गणेश दोनाडकर, कु. रुचिता येलमुले, कु. संजना सेंदरे, संजय भांडे, डॉ. तेजस गायधने तसेच आपल्या संपूर्ण मित्र परिवार या सर्वांचे आभार मानले आहेत.

# ई-लायब्ररीला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या - अमोल माकोडे यांची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील प्रशासकीय कार्यालयाच्या मागे सुरू करण्यात आलेली ई-लायब्ररी (E-Library) ही येथील विद्यार्थी आणि नागरिकांच्या ज्ञानवर्धनासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक महान योद्धे नव्हते तर ते अठरा पगड जातींच्या सर्वसामान्य मावळ्यांना घेऊन त्यांना न्याय देणारे एक उत्तम प्रशासक, दूरदृष्टी असलेले राजे आणि अद्वितीय ज्ञानाचे पुरस्कर्ते होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अस्तित्वाचा नी त्यांच्या कार्याच्या प्रभावाचा पगडा घेऊनच महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि महामानव बाबासाहेबाची वाटचाल आज अजरामर झालेली आहे. आजच्या डिजिटल युगात तरुण पिढीला त्यांच्या आदर्श विचारांची आणि प्रगतीशील दृष्टिकोनाची प्रेरणा मिळणे गरजेचे आहे. या डिजिटल ग्रंथालयाचा मुख्य उद्देश डिजिटल साक्षरता आणि ज्ञानाचा प्रसार करणे हाच आहे. त्यामुळे ब्रम्हपुरी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील प्रशासकीय कार्यालयाच्या मागे सुरू करण्यात आलेल्या नवीन ई-लायब्ररीला 'छत्रपती शिवाजी महाराज ई-ग्रंथालय' (Chhatrapati Shivaji Maharaj E-Library) असे नाव दिल्यास ते सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरेल अशी मागणी शिवसेना च्या वतीने उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी, मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी, योगेश भाऊ मिसार नगराध्यक्ष ब्रम्हपुरी यांना निवेदन देऊन करण्यात आली.

निवेदन देतांना संजय पारटवार उपजिल्हा प्रमुख ब्रम्हपुरी, नरेंद्र नरड तालुका प्रमुख, आकाश शेंद्रे युवासेना तालुका प्रमुख, कवळू पिंपळकर उपतालुका प्रमुख, डॉ सागर माकडे सामाजिक कार्यकर्ता, सुरज माकडे, आशिष गांडलेवार, राकेश भुते, अंकुश भागडकर, गणेश लांजेवार, अनुराग तोंडासे व इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष पदी तनय देशकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टी चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष हरीशजी शर्मा यांनी नुकतीच आपली जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील कार्यकर्त्यांना यात संधी देण्यात आली. या सोबतच त्यांनी जिल्ह्याच्या विविध मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षांची घोषणा केली. भाजपा मध्ये प्रमुख असलेल्या युवा मोर्चाच्या जिल्हा अध्यक्ष पदी ब्रह्मपुरी येथील तनय अतुल देशकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मागील अनेक वर्षापासून तनय देशकर हे ब्रह्मपुरी तालुक्यातील पक्ष संघटन, आरोग्य क्षेत्र व राजकारण व सामाजिक उपक्रमात सक्रिय आहेत. क्रीडा स्पर्धा, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी शिबिरांचे नियमित आयोजन देशकर करत असतात. विशेषत्वाने ब्रह्मपुरी तालुक्यात 'गाव तिथे शाखा' हा उपक्रम राबवून शेकडो युवकांना भाजपा सोबत जोडण्याचे काम त्यांनी केले आहे. ब्रह्मपुरी तालुक्यात युवकांची एक मोठी फळी त्यांनी तयार केली आहे. सर्वांना सोबत घेऊन काम करणे, लोकांच्या अडचणी सोडवत असल्याने तनय देशकर यांची 'कामाचा माणूस' म्हणून ओळख आहे. घरातूनच समाजसेवाचा वारसा मिळाले तनय देशकर आता जिल्ह्यात भाजपाचे काम अधिक जोमाने वाढविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

या निवडीबद्दल तनय देशकर यांनी भाजपाचे नेते, माजी मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार, जिल्ह्याचे पालकमंत्री ना.डॉ. अशोकजी उईके, जेष्ठ नेते, माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहिर, जिल्हाध्यक्ष हरीशजी शर्मा, आमदार बंटीभाऊ भांगडीया, आमदार देवराव दादा भोंगळे, आमदार करणजी देवतळे, माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या सह सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत.

त्यांच्या निवडीबद्दल सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तनय देशकर यांचे अभिनंदन केले आहे.

✻✻✻✻✻✻

# शेतकरी पुत्राची देशपातळीवर चमक

## जेईई ॲडव्हांसमध्ये हरीशचा १२७९ वा क्रमांक

ब्रम्हपुरी/का.प्र.

गुणांपेक्षा जिद्द आणि मेहनत मोठी असते, हे ब्रह्मपुरीतील विद्यार्थी हरीश नंदू दडमल यानी आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे. दहावीच्या परीक्षेत अवघे ७४ टक्के गुण मिळविणाऱ्या हरीशने देशातील सर्वात कठीण स्पर्धा परीक्षांपैकी एक मानल्या जाणाऱ्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेत अखिल भारतीय १२७९ वा क्रमांक (AIR 1279) मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



यापूर्वी झालेल्या जेईई मेन परीक्षेतही हरीशने ९४.३२ टक्के परसेंटाइल मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. मात्र त्यावर समाधान न मानता त्याने सातत्यपूर्ण अभ्यास, नियोजन आणि कठोर परिश्रमाच्या बळावर जेईई ॲडव्हान्समध्येही यशाची पताका फडकवली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या हरीशने ब्रह्मपुरी येथील रिलायबल अकॅडमीच्या मार्गदर्शनाखाली दोन वर्षे अथक परिश्रम घेतले. नियमित सराव परीक्षा, शंका निरसन सत्रे आणि अभ्यासातील सातत्य यामुळे त्याने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले.

हरीशच्या या यशामुळे ब्रह्मपुरी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणास्थान ठरला आहे. रिलायबल अकॅडमीच्या या होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. 'दहावीतील ७४ टक्क्यांपासून जेईई ॲडव्हान्समधील राष्ट्रीय यशापर्यंतचा प्रवास म्हणजे जिद्द, आत्मविश्वास आणि परिश्रमाचा विजय,' अशी भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# अ.जा. उपवर्गीकरणाविरोधात एसडीओंना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ५-६- २०२६ ला वंचित बहुजन आघाडी तालुका ब्रह्मपुरी च्या वतीने अन



जातीचे-उपवर्गीकरण अ ब क ड यांचे विरोधात उपविभागीय अधिकारी( राजस्व) ब्रह्मपुरी यांना निवेदन देण्यात आले

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करून अ ब क ड असे भेद करण्याचे ठरवून राज्य सरकारला त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत परंतु घटनाकारांनी याबाबत घटनेत तसा उल्लेख केलेला नाही. हा अधिकार भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचा नाही तो संसदेचा आहे. भारतात त्याला सगळीकडे विरोध होत आहे ही गंभीर बाब लक्षात घेऊन ब्रह्मपुरी तालुका वंचित बहुजन आघाडी चे ज्येष्ठ नेते डॉ. प्रेमलालजी मेश्राम यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.

देशाचे राष्ट्रपती पंतप्रधान व मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना प्रतिवेदन देण्यात आले मागणी मान्य न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इसारा देण्यात आला.

या प्रसंगी डॉ. प्रेमलालजी मेश्राम, अनिल कांबळे, तालुका उपाध्यक्ष अनंत मेश्राम तालुका सचिव सत्यवान राऊत, यादव रामटेके, भीमराव वंजारी, गंगाधर ठवरे, नरेंद्र खोब्रागडे, देवराज वैद्य, डॉ. हरिदास मेश्राम ,अशोक शेंडे ,हरिदास राऊत ,विलास मेश्राम, वसंत चांदेकर, चिरंजीवासनिक, प्रकाश चौधरी ,डॉक्टर विलास मैंद ,विश्रांती रामटेके, निर्विता मेश्राम, प्रतिभा डांगे, नलिनी घुटके, डॉ. नानाजी मेश्राम ,दीपक ढोक, बाळू चहांदे ,राजकुमार मेश्राम, नीतू मैंद, हे सर्व कार्यकर्ते हजर होते. यशोदा खोब्रागडे, रत्नमाला गायकवाड ,देवराव बनसोड ,मोतीराम मून, रामचंद्र फुलझले, यादव रामटेके ,पुष्प लताबाई भैसारे ,यशवंत रामटेके, हे सर्व कार्यकर्ते हजर होते

# दूषीत पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संताप

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील टिळक नगरसह विविध भागांमध्ये मागील तीन दिवसांपासून नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा लाईनमधून गढूळ, हिरवट, पिवळसर तसेच दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. घराघरात येणारे पाणी अस्वच्छ व वापरण्यास अयोग्य असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, पाण्याला दुर्गंध येत असल्याने हे पाणी पिण्यास तर दूरच, दैनंदिन वापरासाठीही धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. टिळक नगर परिसरातील नागरिकांनी घरातील पाण्याचे नमुने तसेच व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून नगरपरिषद प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आम्ही नियमित पाणीकर भरतो, मग आम्हाला शुद्ध पाणी का मिळत नाही? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. नागरिकांच्या मते, कर वसुली कठोरपणे केली जाते; मात्र मूलभूत सेवा म्हणून शुद्ध पाणीपुरवठ्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप वाढत आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा अभियंता यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या भूती नाल्यावरून होणारा पाणीपुरवठा बंद असून टाकीवरून पंपद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. गोसेखुर्द धरणातून पाणी सोडण्यात आल्यामुळे पाण्याच्या रंगात किंचित बदल झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. जलशुद्धीकरण प्रक्रिया नियमितपणे सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत असला तरी प्रत्यक्षात नागरिकांच्या घरात येणारे पाणी दूषित असल्याचे चित्र दिसत आहे.

या संपूर्ण प्रकरणात नगरसेवक, नगराध्यक्ष आणि लोकप्रतिनिधींची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित एवढ्या गंभीर प्रश्नावर कोणतीही ठोस कारवाई किंवा पाठपुरावा दिसून येत नसल्याने जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, टिळक नगर परिसरातील नागरिकांनी शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठ्याच्या मागणीसाठी लवकरच जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला असून, नगरपरिषद प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पाणीपुरवठ्याची तपासणी करून योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# गुरुदेव भक्त, शिक्षणप्रेमी, समाजसेवक डॉ. विठ्ठलराव बोरकुटे यांचे निधन

नागभीड/प्रतिनिधी

गुरुदेव भक्त, समाजसेवक, शिक्षणप्रेमी व विविध सामाजिक उपक्रमांचे मार्गदर्शक डॉ. विठ्ठलरावजी कवडुजी बोरकुटे यांचे दीर्घ आजाराने गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.४८ वाजता वयाच्या ७८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने नवेगाव (पांडव) परिसरासह सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

डॉ. बोरकुटे हे गुरुदेव भक्त म्हणून परिचित होते. त्यांनी आयुष्यभर समाजहिताची जपणूक करत विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला. शिक्षण संस्थांच्या विकासासाठी त्यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या शांत, संयमी व मनमिळावू स्वभावामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले होते. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेक धार्मिक, सांस्कृतिक व जनहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या कार्याची छाप अनेकांच्या मनावर कायम राहणार असून त्यांच्या निधनामुळे समाजातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार व असंख्य हितचिंतक असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता नवेगाव (पांडव) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले. डॉ. विठ्ठलरावजी बोरकुटे यांच्या निधनाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी दुःख व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# ने.हि. विद्यालय नवेगांव पांडवच्या विद्यार्थ्यांचा अधिकाऱ्यांशी संवाद



नागभीड/प्रतिनिधी

मिशन IAS चे विभागीय संचालक मुनीरज कुथे सर ने. ही. विद्यालय नवेगाव पांडव यांनी आपल्या विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची विविध अधिकाऱ्यांशी गाठभेट घडवून आणली. त्यात सेवानिवृत्त IAS पुरुषोत्तम भापकर शिक्षण उपसंचालक महाराष्ट्र राज्य, भाग्यश्री बानायत, सचिव भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली, सचिन सालोटकर, Assistant Commandant, यांच्याशी संवाद साधला.

तसेच UPSC 2025 चे यशोमणी कु. रेणुका केकन IAS, हेमकृष्ण पुसदे IAS यांच्या सोबत चर्चा करून आपले करिअर निश्चित केले. या भेटीमध्ये देवांशी गुरुदेव खेकारे, वर्ग १० वा, अर्पिता अमोल गेडाम वर्ग १०वा, देवांशू जिवतोडे वर्ग ९ वा तसेच डॉ. सागर आखाडे प्रसिद्ध दंतचिकित्सक ब्रम्हपुरी आपल्या चिरंजीवाचे म्हणजे शर्विल आखाडे च्या भविष्याचा वेध घेण्यासाठी उपस्थित होते.

# भाजपा ओबीसी मोर्चाद्वारे पर्यावरण दिन साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. ०५ जुन २०२६ ला ब्रम्हपुरी येथे पर्यावरण संवर्धन, हरित वातावरण निर्मिती व सामाजिक बांधिलकी जपत भारतीय जनता पक्षाचे ब्रम्हपुरी शहराचे नगर सेवक मनोज भूपाल इतर सर्व सहकारी यांच्या वतीने विश्व पर्यावरण दिन निमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रसंगी पवन जयस्वाल, ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा.प्रकाशजी बागमारे, माजी अध्यक्ष अरविंद नंदुरकर, माजी नगरसेवक मनोज वठे, स्वप्नील अलगदेवे, महिला अध्यक्ष वर्षा चौधरी, युवा मोर्चा अध्यक्ष अमित रोकडे, ओबीसी सेल चे अध्यक्ष दिलीप जुंबळे, भाजप जिल्हा सचिव साकेत भानारकर, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री तनय देशकर, अनुसूजीत जातीचे अध्यक्ष प्रकाश लोखंडे, राजू भागवत, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रश्मीताई पेशन, मंजिरीताई राजनकर, रत्ना दंडवते, चेतना येवले, दत्ता येरावार, अंकज कानझोडे, बंटी येरावर, डॉ.अशोक सालोटकर, केतन पेशन, वर्षा जोशी, घनश्याम सूर्यवंशी आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# गीताचार्य तुकाराम दादा यांचा पुण्यस्मरण सोहळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

सोमवार, दिनांक ८ जुनला गीताचार्य तुकारामजीदादा यांच्या २० व्या स्मृतीदिनानिमीत्त पुण्यस्मरण सोहळा भु वैंकुंठ आत्मानुसंधान अड्याळ टेकडी येथे गीताचार्य तुकारामजी दादा यांच्या विचार व कार्याला समर्पित झालेले सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दुपारी ३:०० वाजता करण्यात आली. या कार्यक्रमात प्रामुख्याने सुबोधदादा संचालक, भू-वैकुंठ आत्मानुसंधान अडयाळ टेकडी, भु वैकुंठ समिती अध्यक्ष डॉ.मुळे, कार्याध्यक्ष सुश्री रेखाताई, उत्तमजी पोहाणे, पुरुषोत्तमजी थुटे, सुखदेवजी वेठे, लालचंदजी नखाते, मेघेश्यामजी वैद्य, पांढरवाणी येथून पालखी घेऊन आलेल्या बेबिआई काकडे व सहकारी मंडळी इत्यादी प्रमुख कार्यकर्ते व गावागावांतून आलेले गुरुदेवप्रेमी कार्यकर्ता गण महासमाधीस्थळावर उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शकांची दादांच्या स्मृतीला अभिवादन व नवनिर्मितीचे कार्य करणारी प्रेरणादायी मार्गदर्शने झाली. 'पूज्य तुकारामदादा गीताचार्य प्रतिष्ठान, नागपूर' यांचे सौजन्याने पुढील वर्षी पासून दादांच्या कार्याचे वहन व प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या उत्कृष्ट सेवकास पुरस्कार देण्याची घोषणा पुरुषोत्तमजी थुटे यांनी केली. त्यानंतर सुबोध दादा यांचे समारोपीय मार्गदर्शन झाले. प्रसंगी पुज्य गीताचार्य दादांना सामूहिक मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ नवलाजी मुळे यांनी केले.

**... QUOTES ...**

**"If you want to be popular, never say an unkind word about anyone."**

**- Thomas A. Kempis**

**चा रो ळी**

चुका करण्याचा प्रश्नच नाही
कधी नाही केले कोणतेच काम...
त्यांचा सातबारा कोरा म्हणून,
करा स्वच्छ चारित्र्याचा सन्मान...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# कडाक्याच्या गर्मीत वनसंवर्धन काळाची गरज - अशोक भैया




ब्रह्मपुरी/का.प्र.

'दिवसेंदिवस वाढत असलेली कडाक्याची ऊन आणि मानवाला सोसावी लागलेली गर्मी यासाठी वनसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे,' असे मत प्रसिद्ध उद्योगपती व शिक्षण महर्षी अशोक भैया यांनी व्यक्त केले. ते कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून वन पर्यावरण प्रदूषण नियंत्रण संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य युवा पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण संरक्षण दिनानिमित्त ५ जून २०२६ ला कृष्णा सेलिब्रेशन हॉल भैय्या कॉम्प्लेक्स येथे १४ वी राज्यस्तरीय पर्यावरण परिषद व सत्कार स्नेह मिलन २०२६ या कार्यक्रमात बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, शासन वृक्ष लावतो त्याचे संवर्धन करतो आणि रोडच्या विकासाच्या कामाकरिता रोडलगतचे झाडे तोडतो जंगल नष्ट करतो ही द्विधा स्थिती शासनच निर्माण करतो. काही का असेना प्रत्येकाने एक तरी झाड लावावे आणि त्याचे संरक्षण करावे यातूनच वनसंवर्धन जपले जाईल.

या कार्यक्रमासाठी उद्योगपती अजय भट्टड, नगराध्यक्ष योगेश मिसार, एपीआय शितल खोब्रागडे ब्रह्मपुरी, नगरसेवक अविनाश राऊत, उद्योगपती बापूराव रामटेके, धनेश अग्रवाल इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विहार मेश्राम यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार दिव्या ठाकरे हिने मानले. या कार्यक्रमाला मुले व मुली आणि बरेच नागरिक उपस्थित होते.


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



## गोसीखुर्द सिंचन....

(पान क्र. १ वरून)

नसल्याचे तत्कालीन व विद्यमान कार्यकारी अभियंत्यांनी बयानात स्पष्ट केले. मृद व जलसंधारण विभाग, सातारा (येणपे ता. कराड काम) या संबंधित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी आपली नसल्याचे व प्रमाणपत्र खोटे असल्याचे सांगितले. सां.बां. (दक्षिण) विभाग, पुणे (गाढले ता. मुळशी रस्ता काम) या संबंधित कंत्राटदाराला असे कोणतेही काम दिले नसल्याचे चौकशीत समोर आले. पावर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नागपूर (नवी मुंबई जीआयएस सबस्टेशन काम) या वरिष्ठ उपमहाप्रबंधकांनी सदर प्रमाणपत्र बोगस असल्याचे बयानात नमूद केले. या बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे कंत्राटदार फर्मचे कुलमुखत्यार मनोजकुमार प्राणनाथ अब्रोल यांनी शासनाची जाणीवपूर्वक फसवणूक करून हे कंत्राट मिळवले.

चौकशीत केवळ कंत्राटदारच नव्हे, तर जलसंपदा विभागाचे तत्कालीन वरिष्ठ अधिकारीही दोषी आढळले आहेत. यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार जे.व्ही. (Joint Venture) फर्मची नोंदणी निबंधक कार्यालयाकडे असणे आवश्यक होते. मात्र, उपनिबंधक भागीदारी संस्था पुणे यांच्याकडील तपासणीत या फर्मची कोणतीही नोंदणी आढळली नाही. बँक खाते व पॅन कार्ड नसतानाही विभागीय लेखाधिकारी व कार्यकारी अभियंत्यांनी काम सुरू करण्याचे आदेश दिले व देयके अदा केली. निविदेचे अद्ययावतीकरण करताना मूळ किमतीत **रु. ३०.३३ लक्ष** (व्हॅट व इन्शुरन्सच्या नावाखाली) नियमबाह्य आणि अवैध पद्धतीने वाढवून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात आले. जर निविदेचे नियमानुसार अद्ययावतीकरण केले असते तर आधिक्य ७.४० टक्के आले असते आणि ती मंजुरीसाठी वरिष्ठ पातळीवरील 'कार्यकारी समिती'कडे गेली असती. समितीला ही निविदा रद्द करण्याचा किंवा दर कमी करण्याचा अधिकार होता. मात्र, अधिकाऱ्यांनी संगनमत करून अनियमित अद्ययावतीकरण केले, ज्यामुळे आधिक्य ४.९४ टक्के दाखवून ते 'कार्यकारी संचालक' यांच्या स्तरावरच मंजूर करून कंत्राटदाराला बेकायदेशीर फायदा मिळवून देण्यात आला.

लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलम १३(१)(ड), १३(२) (भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८) सह भारतीय दंड संहितेच्या (घ्झ्ण) कलम ४२०, ४६५, ४६६, ४६८, ४७१, ३४ अन्वये आरोपी सुधाकर घेंगारे, तत्कालीन विभागीय लेखाधिकारी, गोसीखुर्द उजवा कालवा विभाग, ब्रम्हपुरी, संजय लक्ष्मण खोलापूरकर, तत्कालीन अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, विपाविम, नागपूर, सोपान रामराव सूर्यवंशी तत्कालीन मुख्य अभियंता, विपाविम, जलसंपदा विभाग, नागपूर, देवेंद्र परशुराम शिर्के तत्कालीन कार्यकारी संचालक, विपाविम, नागपूर, मनोजकुमार प्राणनाथ अब्रोल कुलमुखत्यार व भागीदार, मे. सुवर्णा इंटरप्रायजेस, पुणे (रा. टिंगरे नगर, पुणे), मे. सुमेधा अर्थमुव्हर्स कंपनी, पुणे (भागीदारी फर्म), मे. सुवर्णा इंटरप्रायजेस, पुणे (भागीदारी फर्म) आरोपींवर ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा मुख्य कालावधी दिनांक १५/०६/२००९ ते १८/०३/२०१० दरम्यानचा असून, गुन्ह्याचे घटनास्थळ कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द उजवा कालवा विभाग, ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर यांचे कार्यालय

## निवडणूक बिनविरोध, पण नगरसेवकांचा...

(पान क्र. १ वरून)

म्हणून मतदारांना गोव्यासारख्या पर्यटन स्थळांवर किंवा मोठ्या रिसॉर्ट्सवर 'अंडरग्राउंड' ठेवण्याची परंपरा आहे. अनेक नगरसेवक बॅगा भरून सहलीच्या निरोपाची वाट पाहत होते. पंचतारांकित हॉटेल्समधील जेवणावळी आणि महागड्या पार्ट्यांचा आस्वाद घेण्याची स्वप्ने धुळीस मिळाली आहेत. निवडणूक बिनविरोध झाल्याची बातमी धडकताच, या सर्व अपेक्षेवर एका झटक्यात पाणी फेरले गेले. 'तयारी सगळी झाली होती, पण ऐनवेळी पत्ता कट झाला,' अशीच काहीशी भावना सध्या नगरसेवकांमध्ये आहे. लोकशाहीत मतदानाचा हक्क हा सर्वोच्च असतो. परंतु, विधान परिषदेच्या या अविरोध निवडणुकीवर आता ताशेरे ओढले जात आहेत. राजकीय तडजोडींमुळे स्थानिक लोकप्रतिनिधींना मतदानासारख्या पवित्र कर्तव्यापासून वंचित राहावे लागले आहे. राजकीय नेत्यांनी वरच्या पातळीवर सेटिंग केल्यामुळे खालच्या स्तरावरील नगरसेवकांचा मोठा 'आर्थिक आणि मानसिक' तोटा झाला असल्याची चर्चा आता दबक्या आवाजात राजकीय वर्तुळात सुरू आहे.

निवडणूक अविरोध होणे हे वरकरणी चांगले दिसत असले, तरी यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींचा मतदानाचा मूलभूत हक्क डावलला गेला आहे. 'नेत्यांनी स्वत:चे राजकीय स्वार्थ आणि आर्थिक गणिते सांभाळण्यासाठी खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांना आणि नगरसेवकांना वाऱ्यावर सोडले,' असा थेट आरोप आता केला जात आहे. मागच्या काही महिन्यांपासून प्रभागात विकासकामांसाठी निधी नसताना, या निवडणुकीच्या माध्यमातून मिळणाऱ्या 'बोनस'वर अनेकांनी डोळा ठेवला होता. मात्र, दोन्ही विरोधी उमेदवारांच्या अचानक माघारीमुळे नगरसेवकांना केवळ 'हात चोळत' बसण्याची वेळ आली आहे. भाजपमध्ये जरी गुलालाची उधळण होत असली, तरी ज्या मतदारांच्या बळावर हा विजय मिळाला, त्या नगरसेवकांच्या घरात मात्र 'सन्नाटा' पसरला असून, या अविरोध निवडणुकीवर आता जोरदार ताशेरे ओढले जात आहेत. थोडक्यात सांगायचे तर, अरुण लाखानी यांच्या बिनविरोध निवडीने भाजपला 'दिवाळी' साजरी करण्याची संधी दिली असली, तरी तिन्ही जिल्ह्यातील नगरसेवकांसाठी मात्र हा दिवस 'शिमगा' ठरला आहे, हेच खरे!

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404